08 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे लोकार्पण

## कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन; बी.एस्सी., बी. ए. अभ्यासक्रमांचा समावेश

कोल्हापूर, ता. ७ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून शिवाजी विद्यापीठाने विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके स्वतः निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विविध अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन आणि लोकार्पण आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून विद्यापीठांनी पाठ्यपुस्तके मातृभाषेत अनुवादित करून विद्यार्थ्यांना पुरवावीत, असे निर्देश शासनाने दिले. मात्र, त्यामधील तांत्रिक अडचणी लक्षात आल्याने विद्यापीठाने विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके स्वतः निर्माण करण्याचा निर्णय घेतला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बीएस्सी भाग-एक प्राणिशास्त्र विषयाच्या 'ॲनिमल डायव्हर्सिटी' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, श्रीकृष्ण महाजन, सागर डेळेकर, एस. एम. गायकवाड, अर्जुन पन्हाळे, भारती वाली, वर्षा कुंभार उपस्थित होत्या.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बी.एस्सी. भाग-१ सत्र- १ च्या रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र आणि संख्याशास्त्र या विषयांच्या अनुक्रमे वॉटर ॲनालिसिस, ॲनिमल डायव्हर्सिटी आणि एलिमेंटरी प्रॉबॅबिलीटी थिअरी या पाठ्यपुस्तकांचे, तर बी.ए. भाग- १ च्या मानसशास्त्रीच्या 'मैत्री आणि प्रेमाचे मानसशास्त्र' आणि 'आरोग्याचे मानसशास्त्र' या दोन पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. 'शिवाजी युनिव्हर्सिटी प्रेस' या नामाभिधानाखाली विद्यापीठाचे मुद्रणालय ही पुस्तके प्रकाशित करीत आहे.

> शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. या प्रयत्नांना सर्व अधिकार मंडळांचे, शिक्षकांचे मोठे सहकार्य लाभत आहे.
> - **डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसोबतच स्वयम्, महास्वयम् आदी ऑनलाईन मंचांसाठी ई-कन्टेन्ट निर्मिती करण्यासाठीही विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता, अभ्यासमंडळांचे अध्यक्ष, पुस्तकांचे लेखक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024
लोकमत

# विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके देणार : शिर्के

## बी.ए., बी. एस्सी.च्या ५ पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी दिली.

विविध अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते केले. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, सुरुवातीच्या टप्प्यात दूरशिक्षण केंद्राकडील अभ्यास साहित्याचा अनुवाद करून ती विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. त्यापुढे जाऊन विद्यापीठाची स्वतःची क्रमिक पुस्तके निर्माण करावीत असा विचार मनी आला. त्याला अधिकार मंडळांनी पाठिंबा दिला. दुसऱ्या सत्राची पुस्तके सत्रारंभीच विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावीत, असा प्रयत्न आहे. 'शिवाजी युनिव्हर्सिटी प्रेस' या नामाभिधानाखाली विद्यापीठाचे मुद्रणालय ही पुस्तके प्रकाशित करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. बी.एस्सी. भाग-१ सत्र-१ च्या रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, संख्याशास्त्र या विषयांच्या अनुक्रमे वॉटर ॲनालिसिस, ॲनिमल डायव्हर्सिटी आणि एलिमेंटरी प्रॉबॅबिलिटी थिअरी या पाठ्यपुस्तकांचे, बी.ए. भाग-१च्या मानसशास्त्राच्या 'मैत्री आणि प्रेमाचे मानसशास्त्र', 'आरोग्याचे मानसशास्त्र' या दोन पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, सागर डेळेकर, डॉ. विकास मिणचेकर उपस्थित होते.

08 OCT 2024

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके देण्यास विद्यापीठ कटिबद्ध : कुलगुरू डॉ. शिर्के

कोल्हापूर/प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून या प्रयत्नांना सर्व अधिकार मंडळांचे, शिक्षकांचे मोठे सहकार्य लाभत आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून विद्यापीठांनी पाठ्यपुस्तके मातृभाषेत अनुवादित करून विद्यार्थ्यांना पुरवावीत, असे निर्देश शासनाने दिले. तथापि, त्यामधील तांत्रिक अडचणी लक्षात आल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाने विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके स्वतः निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विविध अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन आज कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सुरवातीच्या टप्प्यात दूरशिक्षण केंद्राकडील अभ्यास साहित्याचा अनुवाद करून तो विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. तथापि, त्यापुढे जाऊन विद्यापीठाची स्वतःची क्रमिक पुस्तके निर्माण करावीत, असा विचार मनी आला. त्याला सर्वच अधिकार मंडळांनी पाठिंबा दिला आणि सर्व अभ्यास मंडळे आणि शिक्षकांच्या सहकार्यातून ती आता साकार होऊ लागली आहेत. अत्यंत प्रामाणिकपणे व तन्मयतेने ते हे काम करीत आहेत. पहिल्या पाच विविध पाठ्यपुस्तकांचे लोकार्पण करताना मोठा आनंद होतो आहे. उर्वरित पाठ्यपुस्तकांची कामेही गतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दुसऱ्या सत्राची पुस्तके सत्रारंभीच विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावीत, असा प्रयत्न आहे. 'शिवाजी युनिव्हर्सिटी प्रेस' या नामाभिधानाखाली विद्यापीठाचे मुद्रणालय ही पुस्तके प्रकाशित करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठ राज्यात अग्रेसर असून त्याच्या सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्यात येत आहे. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसोबतच स्वयम्, महास्वयम् आदी ऑनलाईन मंचांसाठी ई-कन्टेन्ट निर्मिती करण्यासाठीही विद्यापीठ प्रयत्नशील आहे.



कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आज बी.एससी. भाग-१ सत्र-१ च्या रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र आणि संख्याशास्त्र या विषयांच्या अनुक्रमे मॅटर ॲनालिसिस, ॲनिमल डायव्हर्सिटी आणि एलिमेंटरी प्रॉबॅबिलिटी थिअरी या पाठ्यपुस्तकांचे, तर बी.ए. भाग-१च्या मानसशास्त्राच्या 'मैत्री आणि प्रेमाचे मानसशास्त्र' आणि 'आरोग्याचे मानसशास्त्र' या दोन पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्यासह प्राणीशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. सुनील गायकवाड, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. जी.बी. कोळेकर, संख्याशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. शशिभूषण महाडिक, मानसशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. विकास मिणचेकर तसेच पाठ्यपुस्तकांचे लेखक व संपादक उपस्थित होते. यामध्ये डॉ. भारत नाईक, डॉ. डी.के. दळवी, डॉ. जी.एन. निकम, डॉ. अर्जुन पन्हाळे, डॉ. भारती वाली, डॉ. वर्षा कुंभार, डॉ. के.डी. पोवार, डॉ. राहुल कदम, डॉ. गिरीश शिरोळे, डॉ. विनायक लोखंडे, डॉ. चेतन गलगले, डॉ. विनोद बापकर आदी उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ. महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

08 OCT 2024

रणझुंजार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके देण्यास विद्यापीठ कटिबद्धः कुलगुरू डॉ. शिर्के

## बी.ए., बी.एस्सी.च्या पाच पुस्तकांचे प्रकाशन



बीएस्सी भाग-१ प्राणीशास्त्र विषयाच्या 'ॲनिमल डायव्हर्सिटी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस.एम. गायकवाड, डॉ. अर्जुन पन्हाळे, डॉ. भारती साळी व डॉ. वर्षा कुंभार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून या प्रयत्नांना सर्व अधिकार मंडळांचे, शिक्षकांचे मोठे सहकार्य लाभत आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून विद्यापीठांनी पाठ्यपुस्तके मातृभाषेत अनुवादित करून विद्यार्थ्यांना पुरवावीत, असे निर्देश शासनाने दिले. तथापि, बाजारातील तांत्रिक अडचणी लक्षात आल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाने विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके स्वतः निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विविध अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन



आज कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सुरुवातीच्या टप्प्यात दूरशिक्षण केंद्राकडील अभ्यास साहित्याचा अनुवाद करून ते विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. तथापि, त्यापुढे जाऊन विद्यापीठाची स्वतःची प्रमाणित पुस्तके निर्माण करावीत, असा विचार पुढे आला. त्याला सर्वच अधिकार मंडळांनी पाठिंबा दिला आणि सर्व अभ्यास मंडळे आणि शिक्षकांच्या सहकार्यातून ती आता साकार होऊ लागली आहेत. अत्यंत परिश्रमपूर्वक व तन्मयतेने ते हे काम करीत आहेत. पहिल्या पाच विविध पाठ्यपुस्तकांचे लोकार्पण करताना मोठा आनंद होतो आहे. उर्वरित पाठ्यपुस्तकांची कामेही गतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दुसऱ्या सत्राची पुस्तके सत्रारंभीच विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावीत, असा प्रयत्न आहे. 'शिवाजी युनिव्हर्सिटी प्रेस' या माध्यमातून विद्यापीठाच्या मुद्रणालयात ही पुस्तके प्रकाशित करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठ राज्यात अग्रेसर असून त्यामध्ये सर्व घटकांचा मोलाचा वाटा आहे. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसोबतच स्वयम्, महास्वयम् आदी ऑनलाईन मंचासाठी ई-कंटेंट निर्मिती करण्यासाठीही विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आज बी.एस्सी. भाग-१ सत्र-१ च्या रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र आणि संख्याशास्त्र या विषयांच्या अनुक्रमे [illegible], ॲनिमल डायव्हर्सिटी आणि एलिमेंटरी प्रोबॅबिलिटी थिअरी या पाठ्यपुस्तकांचे, तर बी.ए. भाग-१च्या मानसशास्त्राच्या 'मैत्री आणि प्रेमाचे मानसशास्त्र' आणि 'आरोग्याचे मानसशास्त्र' या दोन पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आयक्यूएसी संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्यासह प्राणीशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. सुनील गायकवाड, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. जी.बी.



कोळेकर, संख्याशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. शशीभूषण महाडिक, मानसशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. विकास मिणचेकर तसेच पाठ्यपुस्तकांचे लेखक व संपादक उपस्थित होते. यामध्ये डॉ. भारत नाईक, डॉ. टी.के. दळवी, डॉ. जी.एस. निकम, डॉ. अर्जुन पन्हाळे, डॉ. भारती साळी, डॉ. वर्षा कुंभार, डॉ. के.डी. सोनवणे, डॉ. राहुल कश्यप, डॉ. शिरीष शितोळे, डॉ. विनायक होनमोरे, डॉ. चैत्रा राजापुरे, डॉ. विनोद कांबळे आदी



उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ. महाजन यांनीही मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

---

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत १० ऑक्टोबर रोजी सुनावणी

मुंबई : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगामार्फत गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, प्रशासकीय इमारत (दक्षिण विभाग), पहिला मजला, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई येथे सुनावणी होणार आहे. अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील अर्जदारांच्या तक्रारीवर आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्याकडे सुनावणी होणार आहे. संबंधित अर्जदार व संबंधित शासकीय, निमशासकीय, जिल्हा परिषद, महानगरपालिका यांच्या बाबतीत तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणीचे आयोजन करण्यात आलेले आहे, असे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य सचिव [illegible] कमलाकर यांनी कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024

# विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके देण्यास विद्यापीठ कटिबद्ध !

## कुलगुरू डॉ. शिर्के : बी.ए., बी.एससी.च्या पुस्तकांचे प्रकाशन

**। कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून या प्रयत्नांना सर्व अधिकार मंडळांचे, शिक्षकांचे मोठे सहकार्य लाभत आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सोमवारी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून विद्यापीठांनी पाठ्यपुस्तके मातृभाषेत अनुवादित करून विद्यार्थ्यांना पुरवावीत, असे निर्देश शासनाने दिले. तथापि, त्यामधील तांत्रिक अडचणी लक्षात आल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाने विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके स्वतः निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विविध अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सुरुवातीच्या टप्प्यात दूरशिक्षण केंद्राकडील अभ्यास साहित्याचा अनुवाद करून ती विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. तथापि, त्यापुढे जाऊन विद्यापीठाची स्वतःची क्रमिक पुस्तके निर्माण करावीत, असा विचार मनी आला. त्याला सर्वच अधिकार मंडळांनी पाठिंबा दिला आणि सर्व अभ्यास मंडळे आणि शिक्षकांच्या सहकार्यातून ती आता साकार होऊ लागली आहेत. अत्यंत ध्येयनिष्ठपणे व तन्मयतेने ते हे काम करीत आहेत. पहिल्या पाच विविध पाठ्यपुस्तकांचे लोकार्पण करताना मोठा आनंद होतो आहे. उर्वरित पाठ्यपुस्तकांची कामेही गतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बी.एससी. भाग-१ सत्र-१ च्या रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र आणि संख्याशास्त्र या विषयांच्या अनुक्रमे वॉटर ॲनालिसिस, ॲनिमल डायव्हर्सिटी आणि एलिमेंटरी प्रॉबॅबिलीटी थिअरी या पाठ्यपुस्तकांचे, तर बी.ए. भाग-१ च्या मानसशास्त्राच्या 'मैत्री आणि प्रेमाचे मानसशास्त्र' आणि 'आरोग्याचे मानसशास्त्र' या दोन पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. महाजन यांनीही मनोगत व्यक्त केले. तर, कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

0 8 OCT 2024

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरी सहकारी बँकांबाबत रिझर्व्ह बँक सकारात्मक : सतीश मराठे

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** उत्तम कामगिरीचे प्रदर्शन करणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत रिझर्व्ह बँकेने नेहमीच सकारात्मक धोरण अवलंबले आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी आज येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने इनामदार यांच्या जयंतीनिमित्त 'सहकारी बँकांसमोरील प्रश्न व रिझर्व्ह बँक' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख उपस्थित होते.

श्री. मराठे म्हणाले, देशातील आर्थिक परिसंस्था अधिकाधिक मजबूत करण्याकडे रिझर्व्ह बँकेचा कल आहे. त्या प्रयत्नांना बँकांची चांगली साथ लाभल्याने चांगले परिणामही दिसून येऊ लागले आहेत. आपले प्रश्न आपण संस्थात्मक पातळीवर सोडवून देशाच्या विकासाला चालना देण्याच्या या प्रयत्नांमध्ये सहभाग नोंदविण्यासाठी सिद्ध होण्याची गरज आहे. नागरी सहकारी बँकांच्या प्रश्नांबाबत रिझर्व्ह बँक सकारात्मक असल्याचेही त्यांनी सांगितले. मराठे यांनी आपल्या भाषणात नागरी सहकारी बँकांच्या समग्र कामगिरीचा तपशीलवार वेध घेतला.

निपुण कोरे यांनी सतीश मराठे हे नागरी सहकारी बँका आणि रिझर्व्ह बँक यांमधील कणखर दुवा असल्याचे गौरवोद्गार काढले. सर्वच बँका सक्षम होण्याच्या दृष्टीने सार्वत्रिक प्रयत्नांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

0 8 OCT 2024

सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता ही शोषितांचा आवाज असते

## डॉ. सुनीलकुमार लवटे; विद्यापीठात कवी संमेलन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी 'काव्यांगण' हा कवितांचा कार्यक्रम झाला.

कोल्हापूर, ता. ७ : 'दुखः मांडण्याचं साधन कविता आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता जपण्याचं काम कवितेच्या माध्यमातून संवेदनशिल कवी करत असतो. कविता हे एक शस्त्र आहे. समाजातील चांगल्या, वाईट गोष्टींचे चित्रण युवा कवींनी आपल्या लेखनीतून करावे. पिचलेल्या, शोषितांचा आवाज बनण्याचे काम कविता करते' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

लोकराजा ऊर्जा मैत्री परिवारातर्फे आयोजित निमंत्रितांच्या काव्यांगण मैफलीच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

भाषातज्ज्ञ डॉ. माया पंडित म्हणाल्या, 'कविता ही माणसाची नस असते. ऊर्जेचे स्त्रोत, जगण्याची उर्मी ही कवितेत असते. कविता ही जगायला शिकवते. कवीच्या कविता मरतात तेव्हा कवीही संपतो'. डॉ.नंदकुमार मोरे म्हणाले, 'ऊर्जा मैत्री परिवार हा शाहू विचार पेरणारे युवा बीज आहे, कवी संमेलनातून नवा सामाजिक आशय निर्मित करण्याचं काम हा समुह करत आहे, हे कौतुकास्पद आहे.' यावेळी नारायण पुरी (नांदेड), यामिनी दळवी (मुंबई), अविनाश भारती (अंबेजोगाई), उमेश सुतार (कोल्हापूर), रोहित शिंगे (इचलकरंजी), विश्वास पाटील (राधानगरी), नितिन जाधव (सोलापूर) यांनी रचना सादर केल्या. प्रेम, विरह, राजकारण, समाजकारण, आई, ममता, तुकाराम अशा विविध विषयाला अनुसरून आपल्या रचनांचे सुंदर सादरीकरण केले. रसिकांनी त्यास प्रतिसाद दिला. पोलिस उपअधीक्षक समरजित साळवे यांनी मनोगतात स्वरचित कविता सादर केली. ऊर्जा परिवारातर्फे राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक सचिन सुर्यवंशी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक विशाल पाटील यांनी केले. निवेदन विजय चौगले, प्रदिप बोभाटे, राजेश पाटील यांनी केले. आभार युवराज पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024

# वक्तृत्व स्पर्धांतून शाब्दिक, वैचारिक व कलेला वाव

- प्रा. डॉ. शिवाजी जाधव
- लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा




**मुरगूड : दिवंगत लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांच्या जयंतीनिमित्त मंडलिक महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धाचे उद्घाटनप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठातील जनसंवाद व पत्रकारिता विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी जाधव, ॲड. विरेंद्र मंडलिक, अण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे व अन्य.**

वार्ताहर
मुरगूड

मंडलिक महाविद्यालयाने सदाशिवराव मंडलिकसाहेबांचा विचारांचा वारसा अविरत गेली २३ वर्ष या स्पर्धा आयोजित करून जोपासला. उत्कृष्ट वक्ते असणाऱ्या मंडलिकसाहेबांच्या जयंती दिनी वक्तृत्व स्पर्धांच्या आयोजनातून त्यांना दिलेली शाब्दिक, वैचारिक व कलेला वाव देणारी आदरांजली आहे. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील जनसंवाद व पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

दिवंगत लोकनेते माजी खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त येथील मंडलिक महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जय शिवराय एज्युकेशन संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. विरेंद्र मंडलिक होते. प्रास्ताविक प्रा. महादेव बेनके यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. अद्वैत जोशी लिखीत 'श्रीमदभगवदगीतेतील योगदर्शन' या पुस्तकाचे तसेच 'झेप' या नियतकालिकाच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

ॲड. विरेंद्र मंडलिक म्हणाले, वक्तृत्व हा व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य पैलू असून त्या बळावर व्यक्तिमत्त्व विकास होतो. अनेक नेत्यांनी केवळ वक्तृत्व कलेच्या आधारावर आपली राजकीय कारकीर्द घडवली. मंडलिक साहेबांनी वक्तृत्वाच्या माध्यमातून संसदेमध्ये वंचितांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून दिला.

प्राचार्य डॉ. शिवाजी होडगे म्हणाले, वक्तृत्वाच्या मदतीने संधीचे सोने करता येते. स्पर्धेस वेळाधिकारी म्हणून प्रा.डी.व्ही.गोरे व प्रा.सुशांत पाटील यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. संजय हेरवाडे व प्रा. तृप्ती गवाणकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. एम. ए. कोळी यांनी मानले.

यावेळी शेखर मंडलिक, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्रा.डॉ.यु.आर.शिंदे, पांडुरंग सारंग, किरण पवार, एम. एस. पाटील, शिवाजी पोवार, डी. ए. सरदेसाई, व्ही. ए. प्रधान, रामचंद्र पाटील, नितेश रायकर, धनाजी खतकर, विश्वनाथ चौगले, सोनाली कुंभार यांच्यासह प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, स्पर्धक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024
सकाळ

# एमसीए, एमबीए प्रवेशप्रक्रिया सुरू

**गांधीनगर :** उच्च तंत्रशिक्षण विभागातील प्रवेशप्रक्रिया विभागाने प्रवेशाच्या अंतिम तारखेनंतरही रिक्त राहिलेल्या जागांसाठी संस्थापातळीवरील प्रवेशप्रक्रिया पुन्हा सुरू केली आहे. या प्रक्रियेची अंतिम मुदत २३ ऑक्टोबर आहे. ११ सप्टेंबरला एमसीए तर १२ ला एमबीएची प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली होती, तरीही काहीजण प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी आणि काही संस्थांमधील प्रवेश पूर्ण होण्यासाठी प्रवेश प्रक्रिया विभागाने रिक्त जागांसाठी पुन्हा प्रवेशप्रक्रिया सुरू केली आहे. रिक्त जागांवरील प्रवेशासाठी संस्था पातळीवर प्रवेश द्यावेत, अशी सूचना प्रवेशप्रक्रिया विभागाने काढली आहे. अंतिम मुदत २३ ऑक्टोबरपर्यंत आहे. इच्छुकांनी प्रवेश निश्चित करावेत, असे आवाहन सुम्टातर्फे अध्यक्ष डॉ. बापूसाहेब सावंत, उपाध्यक्षा डॉ. स्वेता मेथा, सचिव डॉ. प्रवीण जाधव, खजानीस डॉ. रंजना शिंदे, समन्वयक डॉ. विनोद बाबर, निमंत्रक डॉ. सारंग भोला यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 OCT 2024
लोकमत

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना सुधारित मानधन द्या

कोल्हापूर : तासिका तत्त्वावरील अध्ययन करणाऱ्या प्राध्यापकांना सुधारित मानधन लागू करण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. धनराज नाकाडे यांनी सर्व महाविद्यालयांना दिल्या.

अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांमधील विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात २७ मार्च २०२३ रोजी वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार या प्राध्यापकांचा प्रथम वर्षासाठी ६० मिनिटांचा, तर द्वितीय व तृतीय वर्षासाठी ५० मिनिटांचा तास करण्यात आला होता. त्यानुसार हे मानधन देण्यात येणार आहे. मात्र, शिक्षण विभागाने तास आणि तासिका यामध्ये घोळ घातल्याने प्राध्यापकांना वाढीव मानधनानुसार वेतन मिळत नव्हते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनला तीन कोटी निधींपैकी दीड कोटीची प्रशासकीय मान्यता पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सोमवारी दिली. यावेळी के. मंजुलक्ष्मी, महेंद्र पंडित, अमोल येडगे व एस. कार्तिकेएन उपस्थित होते.

# शरण अध्यासन केंद्रास दीड कोटीचा निधी वर्ग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'शरण साहित्य अध्यासन केंद्र' सुरू करण्यात येणार असून येथील संशोधनासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. यापैकी जिल्हा नियोजन समितीच्यावतीने नावीन्यपूर्ण योजनेतून दीड कोटी रुपयांचा निधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सोमवारी हस्तांतर केला.

शरण साहित्य अध्यासन केंद्रातील संशोधनतून महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसाराची महत्त्वपूर्ण कामगिरी होईल, असा विश्वास पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला. मंत्री मुश्रीफ यांच्या प्रयत्नातून महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जीवनाचा अभ्यास, त्यांचे विचार-कार्याचा प्रचार आणि प्रसारासाठी "शरण साहित्य अध्यासन"ला मंजुरी मिळाली. शरण अध्यासनासाठीचा उर्वरित निधीही लवकरच प्रदान केला जाईल. तसेच त्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही मुश्रीफ यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित, आयुक्त के. मंजुलक्ष्मी, कुलसचिव व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024
पुण्यनगरी

# समाज, शासन यामधील शिक्षक दुवा असला पाहिजे : डॉ. सोनकांबळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकीसाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे शिक्षकांनी समाज आणि शासन यामधील दुवा म्हणून काम केले पाहिजे, असे प्रतिपादन शिक्षणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे जागतिक शिक्षक दिनानिमित्त 'शिक्षणाच्या नवीन सामाजिक करारासाठी शिक्षकांच्या आवाजाचे महत्त्व' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. के. बी. पाटील होते.

डॉ. सोनकांबळे म्हणाल्या, शिक्षण क्षेत्रातील होणारी अधोगती रोखण्यासाठी शिक्षकांनी पुढे आले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या न्याय-हक्कासाठी शिक्षकांनी भूमिका घेणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या नवीन सामाजिक करारासाठी शिक्षकांनी एकाच दृष्टिकोनातून शिक्षणाकडे पाहू नये. शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. आजच्या काळात शिक्षकांचा आवाज, तत्त्व, मूल्य यांचा विचार झाला पाहिजे. यावेळी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर होते. प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. नगीना माळी यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. सचिन भोसले व आभार चांगदेव बंडगर यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 OCT 2024
पुण्यनगरी

# जागतिक बुरशी दिनानिमित्त प्रदर्शनास प्रतिसाद

कोल्हापूर : जागतिक बुरशी दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात विविध प्रकारच्या बुरशींचे दोन दिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये रांगोळी, फोटोग्राफी, पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करून त्याद्वारे बुरशी विश्वाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रदर्शनास विविध स्तरांतून मोठा प्रतिसाद मिळाला.

वनस्पतीशास्त्र अधिविभागात शुक्रवार आणि शनिवार असे दोन दिवस प्रदर्शन पार पडले. प्राणीशास्त्र विभागातील डॉ. एस. आर. यंकंची यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. डॉ. राजाराम गुरव यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. डॉ. एस. जी. घाणे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सी. आर. पाटील यांनी बुरशी जैवविविधता आणि त्यांचे उपयोग या विषयी उपस्थित विद्यार्थी आणि अभ्यासक, संशोधकांना मार्गदर्शन केले. या प्रदर्शनात बुरशीच्या १०० हून अधिक प्रजाती मांडण्यात आल्या. बुरशीची २०० हून अधिक छायाचित्रे मांडण्यात आली, तर ५० हून अधिक पोस्टरही प्रदर्शित करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 OCT 2024
तरुण भारत

# 'समाज-शासनामधील दुवा म्हणून शिक्षकांनी काम करावे'

कोल्हापूर : सामाजिक बांधिलकीसाठी शिक्षकांची भूमिका महत्वाची असल्याने त्यांनी समाज आणि शासन यामधील दुवा म्हणून काम केले पाहिजे, असे प्रतिपादन शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने 'शिक्षणाच्या नवीन सामाजिक करारासाठी शिक्षकांच्या आवाजाचे महत्व' यावर त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. के. बी. पाटील होते. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर होते. डॉ. सोनकांबळे म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी शिक्षकांनी भूमिका घेणे गरजेचे आहे. समाज आणि शिक्षणाचा परस्पर संबंध आहे. त्यांमुळे समाजापर्यंत चांगले नागरिक पाठवण्यासाठी चांगले विद्यार्थी घडवले पाहिजेत. डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नगीना माळी यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. सचिन भोसले यांनी सूत्रसंचालन केले. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.